मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यामधील खाजगी वनासंदर्भात प्रकरणे हाताळण्यासाठी गठित समिती निरस्त करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. एस-१०/२०२५/ प्र.क्र. ४३२/ वने-०३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २५ ऑगस्ट, २०२६

वाचा :

१) महसूल व वन विभाग पत्र क्र. एस-३०/२०१८/प्र.क्र. ६४६/फ-३, दि. २१/११/२०२४.
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एस-१०/२०२५/प्र.क्र. ४३२/वने-०३, दि.४/११/२०२५.
३) रिट याचिका क्र.१५३६/२०१७ व अन्य प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे दि.२३/०७/२०२६ रोजीचे अंतीम आदेश.
४) शासन निर्णय क्र. एस-१०/२०२६/प्र.क्र.५००/वने-०३, दि. १३/०८/२०२६.

प्रस्तावना :

मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय येथे खाजगी वनांसंदर्भात दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांची प्रभावी हाताळणी करण्याच्या दृष्टीने तसेच मा.न्यायालयामध्ये शपथपत्रे दाखल करताना वन विभागाची भूमिका सुयोग्य पध्दतीने मांडणे शक्य व्हावे, यास्तव श्री.एम.एस.रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.४/११/२०२५ नुसार समिती गठित करण्यात आली आहे.

२. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हील अपील क्र. ५४५४/२०९ (रोहन नाहर व अन्य) प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाव्दारे पारित करण्यात आलेल्या दि.७/११/२०२५ च्या आदेशाच्या आधारे तसेच जमिनींच्या महसूली अभिलेखात खाजगी वनासंदर्भात घेण्यात आलेल्या नोंदीविरोधात मा.उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल झाल्या होत्या. सदर याचिकांपैकी १८४ प्रकरणात (रिट याचिका क्र.१५३६/२०१७ व अन्य) एकत्रित सुनावणी घेऊन मा.उच्च न्यायालयाने दि.२३/०७/२०२६ रोजी अंतीम आदेश पारित केले आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या दि.२३/०७/२०२६ च्या आदेशास अनुलक्षून महसूली अभिलेखातील खाजगी वनाच्या नोंदींच्या विरोधात मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल होण्यापूर्वी अशा प्रकरणाची छाननी / तपासणी करण्यासाठी शासन निर्णय दि. १३/०८/२०२६ अन्वये छाननी समिती गठीत करण्यात आली आहे .

३. नमूद करण्यात येते की, या विभागाच्या शासन निर्णय दि.४/११/२०२५ अन्वये गठित करण्यात आलेल्या समितीची कार्यकक्षा खाजगी वनांसंदर्भात दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने दाखल करावयाच्या शपथपत्रांमध्ये मा.न्यायालयांच्या विविध निर्णयांचा विचार करुन सुसंगत शपथपत्र सादर करणे, अशी आहे. त्याचप्रमाणे निदर्शनास आले आहे की, सदर समितीमध्ये श्री.रेड्डी, तत्का.प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) आणि श्री.मोहिते, तत्का. उप वनसंरक्षक (प्रा), पुणे

यांची व्यक्तिश: (By Name) नियुक्ती करण्यात आली आहे. सदर अधिकाऱ्यांची अन्यत्र बदली झाली आहे. हे विचारात घेता, तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दि.२३/०७/२०२६ च्या आदेशास अनुलक्षून शासन निर्णय दि. १३/०८/२०२६ अन्वये गठित करण्यात आलेल्या छाननी/तपासणी समितीच्या पार्श्वभूमीवर मा.न्यायालयामध्ये दाखल करावयाच्या शपथपत्रांच्या तपासणीकरिता गठित केलेल्या प्रस्तुतच्या समितीचे प्रयोजन रहात नाही.

त्याचप्रमाणे विविध वनवृत्तातून मा.न्यायालयामध्ये दाखल याचिकांच्या अनुषंगाने सादर करावयाची शपथपत्रे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) यांच्या तपासणीअंती शासनास प्राप्त होणार आहेत. हे पहाता, प्रस्तुतची समिती निरस्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अंतर्गत संपादित झालेल्या जमिनीबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याव्दारे विविध याचिकांमध्ये देण्यात आलेल्या आदेशांच्या आधारे मा.न्यायालयांमध्ये याचिका दाखल झाल्या होत्या. सदर याचिकांमध्ये शासनाची भुमिका मांडण्यासाठी दाखल करावयाच्या शपथपत्रांच्या तपासणीकरिता शासन निर्णय दि. ४/११/२०२५ अन्वये श्री.एम.एस.रेड्डी, तत्का. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून श्री. महादेव मोहिते, तत्का. उप वनसंरक्षक, (प्रा), पुणे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अंतर्गत दाखल याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या दि. २३/०७/२०२६ च्या आदेशास अनुलक्षून शासन निर्णय दि. १३/०८/२०२६ अन्वये गठित करण्यात आलेल्या छाननी/तपासणी समितीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शासन निर्णय दि.४/११/२०२५ अन्वये गठीत "शपथपत्र तपासणी समितीचे" आता प्रयोजन रहात नाही. सबब, सदरची समिती याव्दारे निरस्त करण्यात येत आहे.

२. तथापि, नमूद करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय येथे वन विभागाच्या विरोधात याचिका दाखल झाल्यास सदर याचिकांमध्ये वन विभागाची धोरणे सुसंगतरित्या मांडून विविध कायद्यांच्या आधारे विभागाची भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र विहित कालावधीमध्ये मा.न्यायालयांमध्ये दाखल करण्याची प्रक्रिया प्रचलित पध्दतीनुसार सुरु राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२५१६४८१३३२४० आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JITENDRA S RAMGAOKAR

Digitally signed by JITENDRA S RAMGAOKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=DA1BD25BE62F91C7B60749717D63394F115854B1B30C0D7CDA850348D6A12577, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=067F696C19CDAEAD50B2E37C6C5A94DB09F968C45E35C16617050C2A9D057202, cn=JITENDRA S RAMGAOKAR
Date: 2026.08.25 16:49:25 +05'30'

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (वने), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) अपर मुख्य वनसंरक्षक (संधारण),महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव), पुर्व/पश्चिम
९) मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
१०) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख), नागपूर
११) उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१२) निवडनस्ती